महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासं/रवका/न.क्र.९/COVID-१९-५/९१९४
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दिनांक : २३.०४.२०२०

# परिपत्रक

**विषय : कोवीड-१९ च्या व्यवस्थापनाबाबत राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचना.**

**संदर्भ :** १) परिपत्रक क्र मासं/रवका/न.क्र. ९/कॅंप पुणे दि. २२.०३.२०२०.
२) परिपत्रक क्र मासं/रवका/न.क्र. ९/Covid-१९-१/कॅंप पुणे दि. १३.०४.२०२०.
३) केंद्र शासन आदेश क्र. ४०-३/२०२०-डीएम-I(ए) दि. १५.०४.२०२०.
४) महाराष्ट्र शासन अधिसूचना क्र. डीएमयु/२०२०/सीआर ९२/डीसएम-१ दि. १५.०४.२०२०.
५) महाराष्ट्र शासन आदेश क्र. डीएमयु/२०२०/सीआर ९२/डीसएम-१ दि. १७.०४.२०२०.
६) शासन निर्णय क्र. समय २०२०/प्र.क्र. ३५/१८ (रवका) दि. १८.०४.२०२०
७) परिपत्रक मासं/रवका/न.क्र.९/COVID-१९-२/९१५६ दि.१९.०४.२०२०
८) महाराष्ट्र शासन आदेश क्र. डीएमयु/२०२०/सीआर ९२/डीसएम-१ दि. २१.०४.२०२०.
९) शासन निर्णय क्र. समय २०२०/प्र.क्र. ३५/१८ (रवका) दि. २१.०४.२०२०
१०) परिपत्रक मासं/रवका/न.क्र.९/COVID-१९-४/कॅंप पुणे दि.२२.०४.२०२०
११) शासन निर्णय क्र. समय २०२०/प्र.क्र. ३५/१८ (रवका) दि. २२.०४.२०२०

महाराष्ट्र शासनाकडून संदर्भ क्र ५ मधील आदेशान्वये आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ च्या अनुषंगाने **कोवीड-१९** च्या व्यवस्थापनाबाबत तसेच बंद (Lock Down) शिथील झाल्यानंतर कार्यालये, कामाची ठिकाणे, कारखाने आणि आस्थापना यांच्याकरीता सामाजिक अंतर राखण्याबाबतची आदर्श कार्यपध्दती विहीत करण्यात आलेली आहे.

२. राज्य शासनाच्या उपरोक्त आदेशान्वये राज्यात काही निवडक संस्था आणि आस्थापना यांच्याकरीता दि. २०.०४.२०२० पासून बंद शिथील करण्यात आला आहे. त्यानुसार महावितरण कंपनीचा सदर आस्थापनांमध्ये समावेश होतो. यास्तव बंद शिथील करीत असतांना महावितरण कंपनीमध्ये व्यवस्थापनाबाबतच्या मार्गदर्शक सूचना संदर्भ क्र ७ अन्वये निर्गमीत केल्या आहेत

३. आता, मुंबई महानगर प्रदेश (MMR) व पुणे महानगर प्रदेश (PMR) येथे वाढत असलेल्या **कोवीड-१९** (कोरोना) विषाणूच्या संसर्गामुळे निर्माण झालेला धोका रोखण्याच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र राज्य यांचे संदर्भीय आदेश क्र ८ अन्वये, दि.१७.०४.२०२० रोजी पारित केलेला शासन आदेशान्वये दिलेली शिथीलता रद्द करुन, दि.१७.०४.२०२० पुर्वी अस्तीत्वात असेलेली बंधने पुनःश्च लागू केली असुन, त्याप्रमाणे मुंबई महानगर प्रदेश (MMR) व पुणे महानगर प्रदेश (PMR) या कार्यक्षेत्रामध्ये येणारी महावितरण कंपनीच्या कार्यालयांनी वरील संदर्भीय क्र ८ च्या शासन आदेशाची योग्य ती अंमलबजावणी करावी.

४. मुंबई महानगर प्रदेश (MMR) व पुणे महानगर प्रदेश (PMR) क्षेत्रातील सर्व महावितरण कंपनी कार्यालयामध्ये अधिकारी / कर्मचारी यांचे एकूण उपस्थिती वरील संदर्भ क्र ११ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे दिलेल्या निर्देशनानुसार ५ % इतकी ठेवण्यात यावी. मुंबई महानगर प्रदेश (MMR) व पुणे महानगर प्रदेश (PMR) ही क्षेत्रे वगळता उर्वरीत ठिकाणच्या महावितरण कंपनीच्या ज्या कार्यालयांचा ग्राहकांशी थेट संबंध येतो, अशा कार्यालयामधील कर्मचाऱ्यांची उपस्थिती एकूण कर्मचारी संख्येच्या १०% प्रमाणे बंधनकारक राहील व कंपनीच्या प्रशासकीय कार्यालयातील कर्मचाऱ्यांची उपस्थिती एकूण कर्मचारी संख्येच्या १०% पर्यंत ठेवण्यात यावी. जेणेकरुन कंपनीचे महत्वाचे / तातडीचे कामकाज व संचलन कार्यक्षमतेस (Operational Efficiency) कोठेही बाधा येणार नाही. तसेच, उर्वरीत कर्मचाऱ्यांना घरुन काम (Work from Home) करण्यास परवानगी देण्यात यावी.

५.  महाराष्ट्र शासनाने संदर्भीय क्र ९ अन्वये लॉकडाऊन कालावधीत शासकीय कार्यालयामध्ये कामकाज करण्यासाठी उपस्थित राहण्यापासून सर्व दिव्यांग अधिकारी / कर्मचारी यांना सूट दिली आहे. याच धर्तीवर, माहावितरण कंपनीमधील सर्व दिव्यांग अधिकारी / कर्मचारी यांना कार्यालयामध्ये कामकाज करणेसाठी उपस्थित राहण्यापासून सुट देण्यात येत आहे.

६.  महावितरण कंपनीचे संदर्भीय क्र ७ चे परिपत्रकातील इतर सुचना अबाधीत रहातील.

७.  महावितरण कंपनीचे संदर्भीय क्र १० चे परिपत्रक रद्द करण्यात येत आहे.

८.  सदर परिपत्रक कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

सोबत : १) दि. २१.०४.२०२० रोजीचा शासन आदेश.
२) दि. २१.०४.२०२० रोजीचा शासन निर्णय.
३) दि. २२.०४.२०२० रोजीचा शासन निर्णय.

(कमांडर शिवाजी इंदलकर) (से.नि.)
मुख्य महाव्यवस्थापक (मासं)

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
**Department of Revenue and Forest, Disaster Management, Relief and Rehabilitation, Mantralaya, Mumbai- 400 032**
**No: DMU/2020/CR. 92/DisM-1, Dated: 21st April 2020**

## ORDER

**Amendment to the Consolidated Revised Guidelines on the measures to be taken for containment of COVID-19 in the State**

---

**Reference:**

1) **Notification No: DMU/2020/CR. 92/DisM-1, Dated 25th March 2020 and 15th April 2020**
2) **Order No: DMU/2020/CR. 92/DisM-1, Dated 17th April 2020**
3) **Addendum Order No: DMU/2020/CR. 92/DisM-1, Dated: 18th April 2020**

In continuation to the Order No. DMU-2020/C.R.92/DMU-1, dated 17th April, 2020 and addendum dated 18th April 2020 of the State Government and in exercise of the powers, conferred under the Disaster Management Act, 2005 the undersigned, in his capacity as Chairperson, State Executive Committee, hereby issues the following orders:-

A. Following amendments to the above referred order number 1 dated 17th April, 2020 shall come into force with immediate effect.

1. In view of large number of people commuting because of the relaxation issued vide order dated 17th April 2020 and also the imminent threat of further spread of the pandemic it is hereby directed in so far as ***Mumbai Metropolitan Region (MMR) and the Pune Metropolitan Region (PMR)*** area is concerned the orders issued on 17th April 2020 shall not apply and the position prevailing prior to the issuance of 17th April 2020 Order shall be reinstated. All enforcing authorities shall ensure that these instructions are followed scrupulously. These guidelines dated 17th April 2020 however will remain operative in other parts of the state.
2. Para14 (v) shall read as follows, "E-Commerce Companies. Vehicles used by Ecommerce operators will be allowed to ply with necessary permission. E-Commerce delivery of essential commodities, food, pharmaceuticals and medical equipment will be permitted."
3. Para 14 (xiii) is deleted.

B. Following amendments to the above referred order number 2 dated 18th April, 2020 shall come into force with immediate effect.

Para 1 shall read as follows, "print media is hereby exempted from the lockdown from 20th April, 2020. Wherever door to door delivery is done, it shall be with the knowledge of receiver and the delivery of newspaper personnel, shall wear mask and use hand sanitizer and maintain social distancing. However, given the extent of spread of COVID-19, door to door delivery of newspapers and magazines is prohibited in Mumbai Metropolitan Region (MMR), Pune Municipal Corporation (PMC) and in all containment zones as may be decided by the District Magistrates. In these areas they may be sold through the establishments that are exempted under the Order dated 17.04.2020."

BY ORDER AND IN THE NAME OF THE GOVERNOR OF MAHARASHTRA.

(AJOY MEHTA)
CHIEF SECRETARY
GOVERNMENT OF MAHARASHTRA

**Copy to:**

1. Principal Secretary to Hon'ble Governor of Maharashtra, Mumbai,
2. Hon'ble Chairman, Maharashtra Legislative Council,
3. Hon'ble Speaker, Maharashtra Legislative Assembly,
4. Principal Secretary to Hon'ble Chief Minister, Government of Maharashtra,
5. Secretary to Hon'ble Deputy Chief Minister, Government of Maharashtra,
6. Private Secretary to Leader of Oppostion, Legislative Council / Assembly,
7. Private Secretaries of All Hon'ble Minister/Minister of State, Mantralaya,
8. All Additional Chief Secretaries/Principal Secretaries/Secretaries of Government of Maharashtra, Mantralaya,
9. Director General of Police, Maharashtra State , Mumbai,
10. Principal Secretary, Public Health Department, Mantralaya,
11. Secretary, Medical Education, Mantralaya,
12. All Divisional Commissioners in the State,
13. All Commissioners of Police in the State,
14. All Commissioners of Municipal Corporations in the State,
15. All District Collectors,
16. All Chief Executive Officers, Zilla Parishad,
17. All District Superintendents of Police in the State.

**महाराष्ट्र राज्यातील कोरोना विषाणू प्रसारावरील प्रतिबंधात्मक उपाय म्हणून लागू करण्यात आलेल्या लॉकडाऊनच्या कालावधीमध्ये दिव्यांग अधिकारी/कर्मचारी यांच्या शासकीय कार्यालयातील उपस्थितीबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : समय २०२०/प्र.क्र.३५/१८(र.वका.)**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय (विस्तार), मुंबई ४०००३२
दिनांक : २१ एप्रिल, २०२०

वाचा:- :

१. शासन अधिसूचना, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक : करोना-२०२० / प्र. क्र.५८ / आरोग्य-५, दिनांक १४ मार्च, २०२०,
२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : समय-२०२० / प्र. क्र. ३५ /१८ (र.वका.), दिनांक १८ मार्च, २०२०,
३. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : समय-२०२० / प्र. क्र. ३५ /१८ (र.वका.), दिनांक २० मार्च, २०२०,
४. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : समय-२०२० / प्र. क्र. ३५ /१८(र.वका.), दिनांक २३ मार्च, २०२०,
५. शासन अधिसूचना, आपत्ती व्यवस्थापन व मदत व पुनवर्सन, क्रमांक : डीएमयू २०२०/सीआर ९२/डीआयएसएम-१, दिनांक १३ एप्रिल, २०२०,
६. शासन अधिसूचना, आपत्ती व्यवस्थापन व मदत व पुनवर्सन, क्रमांक : डीएमयू २०२०/सीआर ९२/डीआयएसएम-१, दिनांक १७ एप्रिल, २०२०.
७. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : समय-२०२० / प्र. क्र. ३५ /१८(र.वका.), दिनांक १८ एप्रिल, २०२०,
८. केंद्रशासनाच्या लोकतक्रार, पेन्शन, कार्मिक व प्रशिक्षण मंत्रालयाचे क्र.११०१३/९/२०१४-Estt-(A III) दिनांक २७ मार्च, २०२० चे आदेश.
९. महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटना, मुंबई यांचे दि. १८ एप्रिल, २०२० चे मा.मुख्य सचिव महोदयांना उद्देशून लिहिलेले पत्र.

**शासन निर्णय**:-

कोरोना विषाणूंचा (COVID-१९) प्रसार राज्यातील कार्यालयांमध्ये होऊ नये, तसेच राज्यातील अधिकारी/कर्मचारी यांना त्यांचा संसर्ग होऊ नये म्हणून विविध प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्याच्या दृष्टीने या विभागाच्या वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या उक्त संदर्भाधीन क्र. २, ३, ४ व ७ येथे नमूद केलेल्या शासन आदेशान्वये शासकीय कार्यालयातील कर्मचाऱ्यांची एकूण उपस्थिती नियंत्रित करण्याबाबतच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

२. याबाबत केंद्रशासनाच्या उक्त संदर्भ क्र. ८ येथील दिनांक २७ मार्च, २०२० च्या आदेशान्वये कार्यालयात अत्यावश्यक सेवा देण्यासाठी उपस्थित राहण्यापासून दिव्यांग कर्मचाऱ्यांना वगळण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यास अनुसरुन महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटनेने दिव्यांग व्यक्तींची रोगप्रतिकारक शक्ती सर्वसामान्याच्या तुलनेत तितकीशी चांगली नसल्याने त्याचप्रमाणे दळण वळणाबाबत ऐनवेळी उद्भवणाऱ्या अडचणींचा सामना करणे दिव्यांगाना कष्टप्रद व त्रासदायक होत असल्याने सर्व दिव्यांग कर्मचाऱ्यांना लॉकडाऊनच्या कालावधीमध्ये कार्यालयात उपस्थित राहण्यापासून सूट देण्याची मागणी संदर्भ क्र. ९ येथील पत्रान्वये केली आहे.

३. उपरोक्त परिस्थितीत राज्यामध्ये लॉकडाऊनच्या कालावधीत शासकीय कार्यालयामध्ये कामकाज करण्यासाठी उपस्थित राहण्यापासून सर्व दिव्यांग अधिकारी/ कर्मचारी यांना या आदेशान्वये सूट देण्यात येत आहे.

४. सदरचे आदेश पुढील आदेशापर्यन्त लागू राहतील.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्याwww.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २०२००४२११६२४३६२१०७ असा आहे. हे आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**(अन्शु सिन्हा)**
**सचिव ( प्र.सु.व.र.व.का )**

**प्रत :**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव (५ प्रती),
२. मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई

३. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
४. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
५. सर्व सन्माननीय विधानसभा, विधानपरिषद व संसद सदस्य,
६. मा. मुख्य मंत्र्यांचे प्रधान सचिव(५ प्रती), मंत्रालय, मुंबई ४०००३२.
७. मा.उपमुख्य मंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
८. सर्व मा.मंत्री / मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
९. मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
१०. मा.महाअधिवक्ता, महाराष्ट्र राज्य,
११. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
१२. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई
१३. प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई
१४. प्रबंधक, लोकायुक्त व उपलोकायुक्त यांचे कार्यालय,
१५. सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई,
१६. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१७. प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई,
१८. मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, मुंबई,
१९. राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त, राज्य सेवा हक्क आयोग, मुंबई,
२०. सर्व विभागीय आयुक्त,
२१. आयुक्त, सर्व महानगर पालिका,
२२. व्यवस्थापकीय संचालक, BEST महामंडळ, मुंबई
२३. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, मुंबई
२४. सर्व जिल्हाधिकारी,
२५. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
२६. सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील सर्व विभागप्रमुख / प्रादेशिक प्रमुख / कार्यालय प्रमुख,
२७. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई (५ प्रती ),
२८. अध्यक्ष/सचिव, महारा्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटना, मुंबई - ३२.
२९. भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.बॅरेक नं.१, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई ४०००२०.
३०. इंडियन नॅशनल काँग्रेस, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस(आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई-४०००२५.

३१. नॅशनलीस्ट कॉंग्रेस पार्टी, ठाकरसी हाऊस, जे.एन.हेरेडीया मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई ४०००३८.
३२. शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई-४०००२८.
३३. बहुजन समाज पार्टी, प्रदेश सचिव, महाराष्ट्र राज्य, बी.एस.जी.भवन, प्लॉट नं. ८३-अे, कलेक्टर कॉलनी, चेंबूर, मुंबई-४०००१४.
३४. भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभवन, एस.व्ही.पटेल रोड, मुंबई ४००००४.
३५. भारतीय कम्युनिस्ट(मार्क्सवादी) पार्टी, महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई ४०००१३.
३६. महाराष्ट्र नवनिर्माण सेवा, राजगड, मातोश्री टॉवर, शिवाजी पार्क, दादर, मुंबई ४०००२८.
३७. सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने, मंत्रालय, मुंबई ४०००३२
३८. निवड नस्ती (का.१८), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई४०००३२.

**महाराष्ट्र राज्यातील कोरोना विषाणू प्रसारावरील प्रतिबंधात्मक उपाय म्हणून लागू करण्यात आलेल्या लॉकडाऊनच्या कालावधीत मुंबई महानगर प्रादेशिक विकास क्षेत्र (M.M.R.) तसेच पुणे महानगर प्रादेशिक विकास क्षेत्रातील (P.M.R.) शासकीय कार्यालयातील उपस्थितीबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : समय २०२०/प्र.क्र.३५/१८(र.वका.)**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय (विस्तार), मुंबई ४०००३२
दिनांक : २२ एप्रिल, २०२०

**वाचा**:- :

१. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : समय-२०२० / प्र. क्र. ३५ /१८(र.वका.), दिनांक २३ मार्च, २०२०,
२. शासन अधिसूचना, आपत्ती व्यवस्थापन व मदत व पुनर्वसन, क्रमांक :डीएमयू २०२०/सीआर ९२/डीआयएसएम-१, दिनांक १७ एप्रिल, २०२०.
३. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : समय-२०२० / प्र. क्र. ३५ /१८(र.वका.), दिनांक १८ एप्रिल, २०२०
४. शासन आदेश, आपत्ती व्यवस्थापन व मदत व पुनर्वसन, क्रमांक :डीएमयू २०२०/सीआर ९२/डीआयएसएम-१, दिनांक २१ एप्रिल, २०२०.

**शासन निर्णय**:-

कोरोना विषाणूंचा (COVID-१९) प्रसार राज्यातील कार्यालयांमध्ये होऊ नये, तसेच राज्यातील अधिकारी/कर्मचारी यांना त्यांचा संसर्ग होऊ नये म्हणून विविध प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्याच्या दृष्टीने या विभागाच्या उक्त संदर्भ क्र. ३ येथील दि. १८ एप्रिल, २०२० च्या शासन निर्णयान्वये राज्यातील शासकीय कार्यालयांमध्ये अधिकारी/कर्मचारी यांच्या उपस्थितीबाबतच्या सविस्तर सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार उक्त शासन निर्णयातील अ) येथील तरतूदीअन्वये संपूर्ण राज्यातील शासकीय कार्यालयांमध्ये अधिकारी व कर्मचारी यांची उपस्थिती १० टक्के इतकी ठेवण्यात आलेली आहे.

२.	आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन यांच्या उक्त संदर्भ क्र. ४ येथे नमूद दि. २१ एप्रिल, २०२० च्या आदेशातील परिच्छेद A(१) अन्वये दिलेल्या सूचनेनुसार मुंबई महानगर प्रादेशिक विकास क्षेत्र (M.M.R.) तसेच पुणे महानगर प्रादेशिक विकास क्षेत्र (P.M.R.) या क्षेत्रांमध्ये कोरोना विषाणूंच्या प्रभावाने अन्य क्षेत्रांपेक्षा गंभीर स्वरूप धारण केले आहे, ही बाब विचारात घेता या क्षेत्रातील कार्यालयांसाठी उक्त संदर्भ क्र. ३ येथील दि. १८ एप्रिल, २०२० च्या शासन निर्णयामधील परिच्छेद २ मधील कार्यालयीन उपस्थितीबाबत पुढीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत:-

(i) मुंबई महानगर प्रादेशिक विकास क्षेत्र (M.M.R.) तसेच पुणे महानगर प्रादेशिक विकास क्षेत्र (P.M.R.) या क्षेत्रातील सर्व शासकीय कार्यालयांमध्ये अधिकारी/कर्मचारी यांची एकूण उपस्थिती उक्त संदर्भ क्र. १ येथील दि. २३ मार्च, २०२० रोजीच्या शासन निर्णयाद्वारे दिलेल्या निर्देशानुसार **५** टक्के इतकी ठेवण्यात यावी. यानुसार कोणते अधिकारी/कर्मचारी उपस्थित राहतील याबाबतचा निर्णय संबंधित सचिवांनी/कार्यालयप्रमुखांनी घ्यावा.

(ii) उक्त क्षेत्राव्यतिरिक्त अन्य क्षेत्रातील शासकीय कार्यालयांसाठी संदर्भ क्र. ३ येथील दि. १८ एप्रिल, २०२० च्या शासन निर्णयान्वये देण्यात आलेल्या सर्व सूचना कायम राहतील.

३.	सदरच्या सूचना पुढील आदेशापर्यन्त लागू राहतील.

४.	सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्याwww.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्र..................असा आहे. हे आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**(अन्शु सिन्हा)**
**सचिव ( प्र.सु.व.र.व.का )**

**प्रत :**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव (५ प्रती),
२. मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
३. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई

४. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
५. सर्व सन्माननीय विधानसभा, विधानपरिषद व संसद सदस्य,
६. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव(५ प्रती), मंत्रालय, मुंबई ४०००३२.
७. मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
८. सर्व मा.मंत्री / मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
९. मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
१०. मा.महाअधिवक्ता, महाराष्ट्र राज्य,
११. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
१२. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई
१३. प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई
१४. प्रबंधक, लोकायुक्त व उपलोकायुक्त यांचे कार्यालय,
१५. सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई,
१६. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१७. प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई,
१८. मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, मुंबई,
१९. राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त, राज्य सेवा हक्क आयोग, मुंबई,
२०. सर्व विभागीय आयुक्त,
२१. आयुक्त, सर्व महानगर पालिका,
२२. व्यवस्थापकीय संचालक, BEST महामंडळ, मुंबई
२३. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, मुंबई
२४. सर्व जिल्हाधिकारी,
२५. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
२६. सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील सर्व विभागप्रमुख / प्रादेशिक प्रमुख / कार्यालय प्रमुख,
२७. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई (५ प्रती),
२८. भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.बॅरेक नं.१, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई ४०००२०.
२९. इंडियन नॅशनल काँग्रेस, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस(आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई-४०००२५.
३०. नॅशनलीस्ट काँग्रेस पार्टी, ठाकरसी हाऊस, जे.एन.हेरेडीया मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई ४०००३८.
३१. शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई-४०००२८.
३२. बहुजन समाज पार्टी, प्रदेश सचिव, महाराष्ट्र राज्य, बी.एस.जी.भवन, प्लॉट नं. ८३-अे, कलेक्टर कॉलनी, चेंबूर, मुंबई-४०००१४.

३३. भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभवन, एस.व्ही.पटेल रोड, मुंबई ४००००४.

३४. भारतीय कम्युनिस्ट(मार्क्सवादी) पार्टी, महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई ४०००१३.

३५. महाराष्ट्र नवनिर्माण सेवा, राजगड, मातोश्री टॉवर, शिवाजी पार्क, दादर, मुंबई ४०००२८.

३६. सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने, मंत्रालय, मुंबई ४०००३२

३७. निवड नस्ती (का.१८), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई४०००३२.